**ज्ञा**नेश्वरीच्या सहाव्या अध्यायात योगमार्गाने ब्रह्मपदाला कसे पोहोचायचे, याविषयी भगवान श्रीकृष्णाने अर्जुनाला ज्ञान दिले. अर्जुनाने देवाला सलगीने प्रश्न केला, ''संतचिन्हे नाही उमजली मला । या मंदमती अडाण्याला । प्राप्त होईल का संतस्थिती? आपण सांगता, त्या परि । मी अभ्यास करीन सत्वरी । योग्यता प्राप्त करीन संतापरी । होईल प्राप्ती ब्रह्मपदाची । सिद्धलक्षण मी ऐकले । मन माझे समाधानी बनले । पूर्ण अवस्थेला जे पोहोचले । कोठे सापडतील पहावया ॥'' अर्जुनाच्या या प्रश्नाला उत्तर देताना श्रीकृष्णाने मनोमन जाणले की अर्जुनाची ब्रह्मपदाला पोहोचण्याची इच्छा खरोखरीच अतिशय तीव्र आहे, मनापासून आहे. ''ब्रह्मत्वाचे डोहाळे दिसू लागले नयनी । वैराग्याचा गर्भसंभव दिसला बुद्धीच्या ठिकाणी । खात्री झाली परमात्म्याची वैराग्याचा वसंत ऋतू उगवला । सोऽहं भावनेचा मोहोर फुटू लागेल त्याला । प्राप्त होईल आत्मप्राप्तीरूपी फळ येण्याला । हे निश्चये जाणले ।

या अभ्यासमार्गाचे वर्णन करताना ''त्यामुळे निश्चित ब्रह्मपदाची प्राप्ती होते'' असे श्रीकृष्णाने सांगितले. आत्मबोधाच्या या मार्गाकडे महान ऋषिमुनी धावले. सिद्ध अवस्थेला साधक अवस्थेतून गेले. श्रेष्ठ पदाला पोहोचले. जे या मार्गाला लागले, त्याला तहान-भुकेचे विस्मरण झाले. मोक्षाची खाण नयनाला दिसताच स्वर्गसुख प्राप्त होते. या मार्गात पाऊल टाकायचे म्हणजे अंतर्मुख व्हायचे. मनाने निश्चल व्हायचे. या मार्गी ज्या स्थानी पोहोचायचे ते स्थानच आपण होऊन जायचे. 'हे अनुभवाचे बोल योगाभ्यासाने जाणशील!' आता मात्र अर्जुन उतावीळ झाला व भगवंताला त्याने तो मोक्षमार्ग दाखवण्याची उत्कंठा तृप्त करण्याची विनंती केली. त्यावेळी भगवंत म्हणाले, ''अरे अर्जुना, तू इतका उतावीळ का होतोस? जरा धीर धर. हा अभ्यास करण्यासाठी योग्य स्थान असावे लागते. हे स्थान कसे असावे? मग भगवंतांनी विस्तारपूर्वक अशा स्थानाचे पुढीलप्रमाणे वर्णन केले.

''सहज मन रिझविल्या बसले असता । तेथोनी उठणे न होईल चित्ता । वैराग्य दुणावले पाहता । धैर्य संतोष वाढेल । जे स्थान रमणीय असते । मन अभ्यासी गढून जाते । हृदयी स्थैर्य नांदते । ऐसे स्थान पाहिजे । जरी पाखंडी येथे आला । तरी तपश्चर्या करावी वाटेल त्याला । विषयासक्त जरी सहज आला । माघारी जाणे विसरतो । चंचल वृत्तीने भटकणाऱ्या मनाला । स्थिर बसावे वाटेल त्याला । अंतर्यामीच्या सुप्त वैराग्याला । प्राप्त होईल चेतना शक्ती । राज्यलक्ष्मीचा त्याग करोनी । स्वस्थ चित्ते रहाणे या स्थानी । ऐसे येईल विलासी पुरुषाच्या मनी । ऐसे रम्य स्थान पाहिजे ।''

अशा मनाच्या अवस्थेला जाण्यासाठी नेमक्या कोणत्या गोष्टी या स्थानामध्ये दिसतात? अनुभवाला येतात? याचे वर्णन करताना श्रीकृष्ण म्हणतात,

''हे रम्य स्थान कसे असते? ते ऐका.

***''जेथे वर्दळ नसेल माणसांची । जेथे वसती असेल साधकांची ।***
***आणि असावे वृक्ष बहुतची । गोड फळांनी लगडलेले ।।१०८।।***
***निर्मळ झरे जिथे असती । शांत अन् मंद वारे वाहती ।***
***त्या ठायी नसावी श्वापदांची भीति । ऐशा स्थानी स्थिर व्हावे ।।१०९।।***
***ऐसे गुप्त निवासस्थान असावे । किंवा शिवालय असावे बरवे ।***
***जे पसंत पडेल तेथे राहावे । एकांतता पाहिजे ।।११०।।***
***तरि विशेषे आताचि बोलिजेल । परि ते अनुभवे उपेगा जाईल ।***
***म्हणौनि तैसे एक लागेल । स्थान पहावे ।।१६३।।***
***जेथ आरणुकेचे नि कोडे । बैठलिया उठू नावडे ।***
***वैराग्यासी दुण चढे । देखलिया जे ।।१६४।।***
***जो वसविला ठावो । संतोषासि साव्हावो ।***
***मना होये उत्सावो । धैर्याचा ।।१६५।।***
***अभ्यासुचि आपणेयति करि । हृदयाचे अनुभउचि विवरी ।***
***ऐसी रम्यपणाची थोरि । अखण्ड जेथ ।।१६६।।***
***जे येणे मनि बखंट । आणि तैसेचि अति चोखट ।***
***जेथ अधिष्ठान प्रगट । डोळा दिसे ।।१७१।।***
***आणिक एक पावे । जे साधकिं वसतें होआवं ।***
***आणि जनाचेनि पायरवे । मेळेचि ना ।।१७२।।***
***जेथ अमृताचेनि पाडे । मुळाहि सकट गोंडे ।***
***जोडति दाटे झाडी । सदा फळति ।।१७३।।***
***पाऊला पाउला उदके । वरिषाकाळिही चोरगे ।***

# श्री वृद्धेश्वर - नाथपंथाचे आद्यपीठ
## (पूर्वार्ध)

**सौ. हेमलता सुधाकर जोशी**

*निझरि का अशेषे । सुलभे जेथ ।।१७४।।*
*हा आतपुही आळुमाळु । जाणिजे तरि सितळु ।*
*पवनु अति निश्चळु । मंद झुळका ।।१७५।।*
*परी आवसिकु पाण्डवा । ऐसा ठावो जोडावा ।*
*तेथे निर्गुडु मठुचि होआवा । का शिवालय ।।१७९।।*
*दोहोमाजी आवडे तें । जें मानले होये चित्ते ।*
*बहुत वसनि ऐकांते । बैसिजे गा ।।१८०।।*

अशा पवित्र स्थानाचे हे वर्णन अहमदनगर जिल्ह्यातील पाथर्डी तालुक्यात असलेल्या ''अतिप्राचीन स्वयंभू' शिवालय म्हणून प्रसिद्ध असलेल्या वृद्धेश्वर मंदिराच्या परिसराशी विलक्षण जुळणारे, साम्य दाखवणारे आहे!!

नवनाथांनी या जागेवर एक प्रचंड महायज्ञ केला होता.

नगरपासून चाळीस मैलांवर असलेले नवनाथ संप्रदायाचे 'आदिपीठ' म्हणून ज्याची ख्याती आहे अशा प्राचीन वृद्धेश्वर मंदिराला भेट दिल्यानंतर, दर्शन घेतल्यानंतर ज्ञानेश्वरीतील या ओव्यांचे स्मरण होते. त्यातील मर्म समजते. किंबहुना हे जणू काही याच स्थानाचे वर्णन ज्ञानेश्वर महाराजांनी केले असे वाटायला लागते. खरोखरीच वृद्धेश्वराचा परिसर असाच, अगदी हुबेहूब या वर्णनासारखाच रम्य आहे. पवित्र आहे. निसर्गरम्यता, एकांतता साधनेला अत्यंत आवश्यक असते. त्यादृष्टीने हे स्थान खरोखरीच अगदी योग्य आहे, महत्त्वाचे आहे, हे मनोमन जाणवते.

भगवान आदिशंकरांच्या मंदिराच्या या परिसराभोवती सर्व बाजूंनी डोंगर आहेत. पावसाळ्यात वाहणारे नैसर्गिक धबधबे, हिरवीगार वनश्री, वृक्षराजी या भागाचे अनुपम वैभव आहे. येथे वड, पिंपळ, औदुंबर, शमी, मांदार, पळस, बिल्व वृक्ष, पांढऱ्या चाफ्याची घनदाट हिरगीवार झाडी आहे. 'खळाळणारे पाणी असलेले ओढे आहेत. ज्यामधील पाणी अगदी स्फटिकाप्रमाणे स्वच्छ आणि शीतल आहे अशी 'ज्ञानवापी' पण याच परिसरात आहे. येथील वातावरण अतिशय प्रसन्न, शांत आहे. मंद मंद वाहणाऱ्या सुगंधित वायूच्या लहरींनी सुखद झालेले आहे. नाथसंप्रदायाचे आदिपीठ, मूळपीठ मानले गेलेले स्वयंभू आणि नित्यसिद्ध शिवालय आहे. 'श्री भगवान शंकराचे पवित्र वसतिस्थान' म्हणून गाढ श्रद्धा, भक्ती आणि प्रेम मनात निर्माण करण्याचे जबरदस्त सामर्थ्य या क्षेत्रात आहे! भगवान शंकरांच्या लीला अगाध आहेत. त्यामुळे त्यांना हजारो नावे प्राप्त झाली. पूर्वी मच्छिंद्रनाथांनी गर्भगिरी डोंगरावर भंडारा घातला होता. सर्व देवतांना आमंत्रणे दिली होती. त्यांत भगवान शंकर प्रमुख होते. त्यांनी पंगतीत वृद्ध माणसाचे रूप घेऊन वाढण्याचे काम केल्यामुळे त्यांना 'म्हातारदेव' हे पण नाव मिळाले. हे स्थान वृद्धेश्वर, आदिनाथ आणि म्हातारदेव त्या नावांनी पण प्रसिद्ध आहे.

भंडारा संपल्यानंतर सर्व देव आपापल्या ठिकाणी गेले. पण शंकराला हे निसर्गरम्य ठिकाण खूप आवडले. त्यामुळे ते या ठिकाणी कायमचेच राहिले. येथील शिवलिंग अतिशय प्राचीन आणि जागृत आहे. स्वयंभू आहे. हे मंदिर दोन डोंगरांच्या घळीत उभे आहे. त्याच्याभोवती चौकोनी तटबंदी बांधलेली आहे. देऊळ लहान असले तरी आतला सभामंडप प्रशस्त आहे. गाभाऱ्यात अनेक शिवलिंगांचे मिळून स्वयंभू शिवलिंग आहे. त्याच्याखालून जिवंत झरा अखंड वाहत असतो. समोर कोनाड्यात पार्वतीची प्रसन्न मूर्ती आहे. हे प्राचीन शिवलिंग येथे कसे निर्माण झाले याचा इतिहास अतिशय मनोरम आहे. त्या स्थानाला नाथपंथाचे आदिपीठ का म्हणतात, याचे पण उत्तर या इतिहासात मिळते.

नवनाथ म्हणजे नऊ नारायण होय. त्यातील प्रमुख नारायण म्हणजे मच्छिंद्रनाथ! त्यांचा जन्म माशाच्या पोटी झाला. त्यांनी घनघोर तपश्चर्या केली. दत्तगुरू प्रसन्न झाले आणि त्यांना गुरुउपदेश दिला. नंतर मच्छिंद्रनाथ जनकल्याणासाठी तीर्थयात्रा करीत जगन्नाथहून रामेश्वरला गेले. वाटेत स्त्रीराज्यात येऊन पोहोचले. राणी मैनाकिनीची भेट झाल्यावर त्या भव्य राजवाड्यात आणि सुंदर वातावरणात ते रमले. मैनाकिनीशी विवाह केला. त्यांना मीननाथ नावाचा पुत्रपण झाला. मच्छिंद्रनाथ विषयोपभोगात रमून गेले. परंतु त्यांचा प्रमुख शिष्य गोरक्षनाथ मात्र गुरूच्या शोधात फिरत होता. कानिफनाथांकडून गुरूचे वास्तव्याचे ठिकाणा समजल्यावर गुरूंना घेऊन जाण्यासाठी तो स्त्रीराज्यात आला.

परंतु पुरुषांना तिथे प्रवेश नव्हता. शेवटी गोरक्षनाथाने 'कलिगा' नावाच्या सुंदर नर्तकीच्या साहाय्याने स्त्रीरूप घेऊन राजवाड्यात प्रवेश करून मृदुंग वाजविण्याच्या कलेचे सुंदर प्रदर्शन केले. नृत्याच्या कार्यक्रमाच्या वेळी गोरक्षनाथाने स्त्रीवेष धारण केला होता. सिंहासनावर मच्छिंद्रनाथ आणि मैनाकिनी बसले होते. नृत्य सुरू झाले. गोरक्षनाथाने तालसुरावर मृदुंग वाजवण्यास सुरुवात केली. तो वाजवताना तो 'चलो मच्छिंदर गोरख आया' अशा आवाजाचे बोल काढू लागला. त्याबरोबर मच्छिंद्रनाथ आश्चर्यचकित झाले. आपला शिष्य आपल्याला घेऊन जाण्यासाठी आला आहे हे समजून ते उदास झाले. कारण मैनाकिनीचा वियोग होणार होता. शेवटी त्यांना गोरक्षनाथाची इच्छा मान्य करावी लागली आणि पुत्र मीननाथासह ते गोरक्षाबरोबर निघाले. मैनाकिनीचे सर्व प्रयत्न व्यर्थ झाले. तिने एक सोन्याची वीट गोरक्षाच्या नकळत मच्छिंद्राला दिली. ती त्याने आपल्या झोळीत लपवली.

प्रवास करीत ते सौराष्ट्रातून औंढ्या नागनाथ, परळी वैजनाथ या ठिकाणी तीर्थयात्रा करीत गर्भगिरी पर्वताच्या प्रदेशात आले.

या ठिकाणी घनदाट झाडीचे मोठे वन होते. सोन्याची वीट जवळ असल्याने मच्छिंद्रनाथांना चोरांची भीती वाटू लागली. ते परत परत गोरक्षनाथांना विचारू लागले, "या जंगलात चोराचे भय नाही ना?" गोरक्षनाथांना आश्चर्य वाटले. आपल्या गुरुजींना हे भय का वाटत आहे? त्यांच्याजवळ द्रव्य असले पाहिजे! काही अंतर चालून जाताच ते एका नदीजवळ आले. तेथे लोकांची वस्ती होती. आपली झोळी झाडाच्या पारंबीला अडकवून त्यांनी स्नान केले. गोरक्षनाथांनी भिक्षा मागून आणली. जेवण करून ते विश्रांती घेऊ लागले. गोरक्षनाथांना झोप लागेना. ते हळूच उठले. मच्छिंद्रनाथ व मीननाथ झोपल्याची खात्री करून त्याने गुरुजींची झोळी हळूच काढली आणि आत हात घातला. हाताला सोन्याची वीट लागली. गोरक्षनाथांना आपल्या गुरूंची अतिशय चीड आली. त्यांच्यासारख्या निरिच्छ संन्याशाने अशा सोन्याच्या विटेचा लोभ धरल्याचे त्यांना आवडले नाही. त्यांनी सरळ ती वीट नदीत भिरकावून दिली. आणि एक दगड झोळीत ठेवून तो झोपला. गर्भगिरी डोंगराच्या जवळून वाट काढीत ते पुढे जाऊ लागले. गुरूंनी परत तोच प्रश्न केला. तेव्हा गोरक्षाने उत्तर दिले, "जी भीती होती ती मागे राहिली आहे. आता कसले भय नाही!" त्याबरोबर मच्छिंद्रनाथांनी झोळीत हात घातला, तर दगड लागला! ते जमिनीवर गडबडा लोळू लागले, रडू लागले. रडता रडता म्हणाले, 'अरे, या गर्भगिरी डोंगरावर मला सर्व देवांना आणि भक्तांना आमंत्रित करून जेवणावळ करायची होती. म्हणून मी सोन्याची वीट आणली होती. आता तू माझा बेत धुळीला मिळवलास! गोरक्षनाथांनी सिद्ध मंत्र म्हणून गर्भगिरी जल डोंगरावर फेकताच तो पर्वत सोन्याचा झाला. गोरक्ष म्हणाला, "गुरुजी, घ्या हवे तेवढे सोने! आणि घाला भंडारा!" गोरक्षनाथांचे हे विलक्षण कृत्य पाहून गुरूंना अतिशय आनंद झाला.

त्यानंतर त्या स्थानावर सर्व नवनाथांनी मोठा यज्ञ केला. यज्ञाचे निमंत्रण देवादिक, संतमहात्मे, राजेरजवाड्यांना, यक्षकिन्नर, गंधर्वांना पण दिले होते. या भव्य यज्ञाचा आणि भंडाऱ्याचा कार्यक्रम एक महिनाभर चालला होता. या भव्य यज्ञसमारंभाचे अध्यक्षपद आदिनाथ शंकरांनी भूषविले होते. शिवमूर्तीच्या ठिकाणी ते स्थानापन्न झाले होते. त्यांना पुढे विश्वेश्वर-म्हातारदेव हे नाव पडले. त्यांचा शिष्य मच्छिंद्रनाथांनी जो यज्ञाग्नी प्रज्वलित केला तो अजूनही देवालयाच्या प्रवेशद्वाराशी, नाथसंप्रदायाच्या तेजस्वी तत्त्वज्ञानाची साक्ष देत असतो, धगधगत असतो. भंडारा संपल्यावर सर्व देवादिक परत गेले. कानिफनाथास वृद्धेश्वरचा परिसर खूप आवडला म्हणून तो 'मठी' येथे राहिला. स्वत: भगवान शंकर 'लिंगरूपाने' तेथे राहिले. ते लिंग दरवर्षी थोडे थोडे वाढत असते म्हणून त्यास वृद्धेश्वर हे नाव पडले. शंकरांना हे स्थान फार आवडले. मच्छिंद्रनाथही तेथे राहिले. त्यांच्या स्थानाला 'मायंबा' म्हणतात. शंकर पार्वतीसहित लिंगरूपाने राहिल्यानंतर लिंगाभोवती मंदिर बांधण्यात आले. हे बांधकाम एक हजार दोनशे वर्षांपूर्वी झाले आहे.

या मंदिराच्या सभामंडपात एक मोठी पितळी घंटा लटकवलेली आहे. ती घंटा प्राणदेव नावाच्या राजाने नऊ शतकांपूर्वी मंदिरास अर्पण केलेली आहे. येथील लिंग दर महाशिवरात्रीला रात्री बारा वाजता हरबऱ्याच्या दाण्याइतके वाढते आहे. फार वर्षांपूर्वी लिंग झाकण्यासाठी एक टोप बनवला होता. पण लिंग वाढत असल्याने त्यावर तो टोप बसत नसे. म्हणून तो पहिल्यापेक्षा मोठा केला. असा तीन वेळा तो टोप मोठा करून सुद्धा लिंगावर बसत नाही. त्यामुळे तो आता मंदिराच्या सभामंडपात कोपऱ्यात ठेवलेला आहे. लिंगाजवळून कायमस्वरूपात पाणी वाहत असते. असे म्हणतात की, ते काशीचे पवित्र पाणी आहे!

इतर शंकराच्या ज्योतिर्लिंग स्थानांवर अथवा मंदिरांमध्ये पार्वतीची मूर्ती नसते. पण वृद्धेश्वर मंदिरात मात्र पार्वतीची प्राचीन मूर्ती आहे. मुख्य दरवाजातून आत जाताना तीन देवळ्या दिसतात. त्या तीन कृतूच्या आहेत. त्यांचा आकार त्रिकोणी आहे. मधल्या देवळीतून सूर्याचा प्रकाश काही मिनिटे पार्वतीच्या पायावर पडतो. पार्वतीची मूर्ती अतिशय आकर्षक असून दगडात कोरलेली आहे. दक्षिणेला गणेशमूर्ती तर उत्तरेला काळभैरवाची मूर्ती आहे. मंदिराचे मुख्यद्वार पश्चिमेला असून पूर्वेकडे आणि दक्षिणेकडे पण एक द्वार आहे.

मंदिराच्या पूर्वेला एक मोठी बारव आहे. तिला 'ज्ञानवापी' म्हणतात. त्यात पाणी कायमस्वरूपात भरलेले असते. बारवेच्या शेजारी ज्ञानेश्वरांचे मंदिर आहे. ज्ञानेश्वर महाराज पैठणहून आळंदीला जाताना या तीर्थस्थानाहून गेले होते. ते या ठिकाणी खूप दिवस राहिले होते. नाथपंथाचे आद्य शंकरांनी पार्वतीला जे ज्ञान सांगितले, ते मच्छिंद्रनाथांनी ऐकले. ते त्यांनी गोरक्षनाथाला दिले. गोरक्षनाथांनी गहिनीनाथांना, गहिनीनाथांनी निवृत्तिनाथांना आणि त्यांनी ज्ञानेश्वरांना ते ज्ञान दिले. अशी ही परंपरा आहे. ज्ञानेश्वरांनी येथे वास्तव्य करीत असताना भगवद्गीतेचे मराठीत भाषांतर करण्याचे ठरवले. 'ज्ञानवापी' बारवेशेजारी बसून भगवान शंकराला नमन केले आणि 'ज्ञानेश्वरी' या महान ग्रंथाच्या पहिल्या ओवीची रचना या ठिकाणी केली.

वृद्धेश्वर हे देवस्थान अतिशय प्राचीन आणि अत्यंत जागृत देवस्थान आहे. या ठिकाणी लग्ने लावली जातात. ट्रस्टतर्फे सर्व सोयी केल्या जातात. जवळच नदी आहे. तिला 'वृद्धा' असे नाव आहे. या नदीत बाराही महिने पाणी असते. मच्छिंद्रनाथाने पेटविलेला होमकुंड आजही मंदिराच्या आवारात अखंड प्रज्वलित ठेवला जात असतो. अग्नी विझू दिला जात नाही. त्यातील

भस्म, अंगारा सर्वजण प्रसाद म्हणून घेतात.

गर्भगिरी डोंगरावर व त्याच्या पायथ्याशी मोठे जंगल असून त्यात कोल्हे, अस्वल, हरीण, लांडगा, ससे, माकडे यांसारखे प्राणी वावरतात. सूर्यप्रकाश खाली पडणार नाही इतकी घनदाट झाडी आहे. बोरी, बाभळी, निर्गुंडी, सीताफळ, पळस, चिंच, आपटा, आवळा अशी औषधी झाडे पण आहेत.

वृद्धेश्वर येथे वर्षातून दोन मोठ्या यात्रा भरतात. पहिली यात्रा महाशिवरात्रीला भरते. ती फार मोठी असते. दुसरी यात्रा श्रावण महिन्यात दुसऱ्या आणि तिसऱ्या सोमवारी भरते. गोदावरी, गंगा नदीचे पाणी आणून महादेवाला स्नान घातले जाते. रात्री भजन, कीर्तनाचे कार्यक्रम होतात. श्रावण महिन्यात बेल आरती होते. हजारो बेल वाहिला जातो. असंख्य भाविकांचे हे फार पवित्र श्रद्धास्थान आहे.

नाथसंप्रदायातील अनेक साधकांची ही तपोभूमी आहे. येथील डोंगरगण भागात एकवीस औदुंबरांच्या छायेत राहून गहिनीनाथांनी तपश्चर्या केलेली होती. आदिनाथांचे महान शिष्य मच्छिंद्रनाथांनी वृद्धेश्वराच्या टेकडीवर वर्षानुवर्षे तपश्चर्या करून योगविद्येचा अभ्यास केलेला आहे. तेव्हापासून ते आजपर्यंत अनेक मुक्त आणि सिद्ध पुरुषांचे वास्तव्य येथे झालेले आहे. वृद्धेश्वराच्या भोवताली असलेल्या डोंगरावर अनेक नाथपंथी साधूंच्या गुंफा आहेत.

आदरणीय सद्गुरू श्री शंकर महाराजांचे हे अत्यंत आवडते ठिकाण होते. नगरला आल्यानंतर शंकर महाराज नेहमी वृद्धेश्वराला भेट देत असत. तिथे वास्तव्य करीत असत. त्यांचे लाडके शिष्य डॉ. नागेश रामचंद्र धनेश्वरांना शंकर महाराजांनी या नाथपंथी साधूंच्या गुंफा स्वत: दाखवल्या होत्या. काही गुंफांमध्ये इतका घनदाट अंधार होता की बॅटरी घेऊनच त्यांना आत प्रवेश करावा लागला. अशाच एका गुंफेमध्ये शंकर महाराजांनी डॉ. धनेश्वरांना त्यांच्या पूर्वजन्माची खूण पटवली होती.

त्या गुंफेमध्ये गेल्यावर एका स्थानाकडे बोट दाखवून शंकर महाराज म्हणाले, "ही गहिनीनाथांच्या ध्यानाची जागा आहे. तिथे ते स्वत: बसत आणि भोवतालच्या जागांवर त्यांचे शिष्य बसत असत. साधनाकाळात वर्षानुवर्षं एकाच ठिकाणी बसल्यामुळे दगड झिजले आहेत. त्यावर बसणाऱ्या साधकाच्या बैठकीचा आकार त्यांना प्राप्त झाला–आणि डॉक्टर, तूही त्यात होतास!" शंकर महाराजांचे हे बोलणे ऐकून डॉक्टर धनेश्वर आश्चर्यचकित झाले व म्हणाले, "मी? मी होतो त्यांच्यामधील एक? मग माझी जागा सापडेल इथं?"

"सापडायलाच हवी. शोधून बघ!"

डॉक्टर धनेश्वर अंधुक प्रकाशात एकेका दगडावर बसून अंदाज घेऊ लागले. आणि खरोखरच एका दगडावर बसताच त्यांना विलक्षण जाणीव झाली! मोठ्या आनंदाने ते म्हणाले, "महाराज, हीच... हीच माझी जागा! हे आसन माझ्याच मापाचे आहे!" महाराज पण आनंदित होऊन त्यांना म्हणाले, "तू नाथ परंपरेतला आहेस याची खात्री पटली? नाथ परंपरेतील अधिकारी पुरुषाने ज्याला एकदा दीक्षा दिली त्याला तो कधीच अंतर देत नाही. तो मनुष्य जन्मोजन्मी नाथपरंपरेत राहतो आणि तिच्या शिकवणुकीप्रमाणे जगतो!"

याच वृद्धेश्वराच्या पवित्र मंदिराच्या मागील बाजूस असणाऱ्या ओवऱ्यांमध्ये शंकर महाराजांनी एक अपूर्व अनुभव त्यांच्या भक्तांना दिला होता. नटराजाच्या दिव्य संगीताच्या श्रवणाची अनुभूती दिली होती. या रम्य परिसरात ते वारंवार जात असत. एकदा त्यांच्याबरोबर त्यांचे आवडते शिष्य म्हणजे सरदार नानासाहेब मिरीकर, श्री. जनुभाऊ मिरीकर, अण्णासाहेब थोरात, दादा कारखानीस, श्री. आबासाहेब श्रोत्री, डॉ. धनेश्वर यांच्यासमवेत ते वृद्धेश्वरला गेले. दोन मोटारींतून मंडळी सायंकाळी पोहोचली. बरोबरच्या नोकरांनी रात्री स्वयंपाक केला . जेवण आटोपून सर्व मंडळी देवळातील ओवऱ्यांवर गप्पा मारत पायऱ्यांवर झोपी गेली.

✧✧✧

पहाटे चार वाजता शंकर महाराजांनी सर्वांना उठवले आणि म्हणाले, "आता लक्ष देऊन सर्वजण ऐकत राहा....!"

थोड्याच वेळात शिवालयाच्या गाभाऱ्यातून धीरगंभीर असा प्रणवघोष सर्वांच्या कानावर आला. ॐकारचा ध्वनी आकाशात विरतो न विरतो तोच सनईचे मंजूळ स्वर आसमंतात घुमू लागले. ललत रागाची सुरावट झाली. त्यानंतर कुणीतरी 'भटियार' राग आळवायला सुरुवात केली. गायक अदृश्य होता, पण त्याने लावलेल्या षड्जानेच श्रोत्यांच्या अंतराची तार छेडली गेली. खर्जातला धैवत हृदयाला जाऊन भिडला. षड्ज आणि मध्य धैवत त्याने असा काही आर्ततेने लावला की कुणीतरी सा....ध....साध म्हणण्याऐवजी राधेऽ राधेऽ म्हणून आपल्या प्रियतमेला साद घालीत आहे.

सर्वजण अगदी मंत्रमुग्ध होऊन तल्लीनतेने आणि प्रसन्नतेने ते गाणं श्रवण करीत होते. त्यांच्या देहाचे अणुरेणू त्या ध्वनि-लहरींनी पुलकित झाले होते... सारे आनंदाने डोलत होते...

मग उगवतीवर केशरी रंगाची उधळण झाली. सूर्योदयाची चाहूल लागली आणि ब्राह्ममुहूर्तावर सुरू झालेले ते मधुर संगीत, ते दिव्य संगीत हलकेच वातावरणात विरून गेले!!

मैफिल संपली, पण तिच्या दिव्य मावळत्या स्वरलहरींनी आसमंत भारलेलाच होता. एक स्वर्गीय नादब्रह्म तिथे तयार झाले होते. त्या कैफातून बाहेर आल्यावर नानासाहेब मिरीकरांनी विचारलं, "महाराज, आपण इतक्या वेळा येथे आलो, पण असं देहभान हरपून टाकणारं गाणं कधीच ऐकल नव्हतं. हे गायक कोण? कुठले? केव्हा आले? आणि ते आता गाणार आहेत हे आपल्याला कसं समजलं?"

त्यांचा प्रश्न ऐकून शंकर महाराज हसले आणि म्हणाले, "आम्ही हे दिव्य संगीत कित्येकदा ऐकतो पण आज तुम्हीही ते ऐकावं असं वाटलं म्हणून ऐकवलं झालं!"

"पण ते गायक?'

"नृत्यसंगीताचे उद्गाते साक्षात देवाधिदेव नटराज शिवशंकर... श्री वृद्धेश्वर!!"

महाराजांच्या कृपेने वृद्धेश्वर मंदिरात ज्यांना असं दिव्यसंगीत ऐकायला मिळाले ते भक्त खरोखरीच भाग्यवान ठरले!

माझे वडील स्वर्गीय गोपाळ सोमनाथ देशपांडे हे अहमदनगर येथे सिनियर पब्लिक प्रॉसिक्यूटर म्हणून कायद्याच्या क्षेत्रात कार्य करीत होते. इंग्रजी आणि संस्कृत भाषेवर त्यांचे विलक्षण प्रभुत्व होते. कोर्टामधील उत्कृष्ट इंग्रजी भाषेत ते जेव्हा अर्ग्युमेंट्स करीत तेव्हा सर्व वकील लोक, न्यायाधीश अतिशय तन्मय होत असत. त्यांचे अर्ग्युमेंट हा एक आदर्श वस्तुपाठच असे. वडिलांच्या मनावरचे संस्कार अतिशय आध्यात्मिक स्वरूपाचे होते. संपूर्ण घराण्यात चालत आलेली साईकृपा त्यांनाही लाभलेली होती. त्यामुळेच वृद्धेश्वरला जाऊन रुद्राची आवर्तने करण्याची प्रचंड आवड त्यांना लागली. आयुष्यातील पंचवीस वर्षांच्या काळात ते आणि त्यांचे समवयस्क वकील मित्र श्री. दादासाहेब चौधरी, दादा धर्माधिकारी, नागेशराव डावरे, राजाभाऊ वैकर, आबासाहेब श्रोत्री, श्री. अण्णासाहेब खेर यांनी सातत्याने पैठण ते वृद्धेश्वर अशी पदयात्रा केली. महाशिवरात्रीच्या अगोदर तीन दिवस पैठणहून पवित्र गोदावरी गंगाजळीची कावड खांद्यावर घेऊन ते सर्वजण पायी पदयात्रा करीत महाशिवरात्रीला वृद्धेश्वरला पोहोचत. बरोबर ११॥ वाजता 'ज्ञानवापी'च्या थंडगार पाण्याने स्नान करून ओलेत्याने गाभाऱ्यात प्रवेश करीत असत. त्यानंतर रात्री बरोबर बारा वाजता माझे वडील श्री. गोपाळराव त्यांच्या शास्त्रशुद्ध, घनगंभीर स्वरोच्चारात रुद्राची आवर्तने खड्या आवाजात सुरू करीत. त्यांच्या लघुरुद्राच्या घनगंभीर पठणाने संपूर्ण मंदिर अगदी भारल्यासारखे होत असे. भगवान शंकरांच्या लिंगावर गंगाजलाच्या पाण्याचा अभिषेक होत असताना रुद्रपठण करणाऱ्या माझ्या वडिलांची सात्विक मूर्ती आजही माझ्या डोळ्यांसमोर साक्षात उभी असते! त्यांची तन्मयता, त्यांचा भक्तिभाव, त्यांच्या स्वरातून अतिशय प्रभावीरित्या व्यक्त होत असे. 'वृद्धेश्वर' हे त्यांच्या आयुष्याचे, आध्यात्मिक जीवनाचे एक पवित्र स्थान चिरंजीव स्थाने ठरले. आयुष्यभर या वृद्धेश्वराची त्यांनी अत्यंत श्रद्धेने उपासना केली...

पंचवीस वर्षे केलेली वृद्धेश्वराची पदयात्रा हा त्यांचा फार मोठा आध्यात्मिक प्रगतीचा भाग ठरला, प्रेरणास्थान ठरले...!!

या वृद्धेश्वराची भक्तिभावाने उपासना करणाऱ्या साधकांना खरोखरीच अतिशय चांगले, जागृत स्वरूपाचे अनुभव आले आहेत, येत असतात. मर्चंट नेव्हीमध्ये असणाऱ्या श्री. सतीश

# श्री वृद्धेश्वर - नाथपंथाचे आद्यपीठ

## (उत्तरार्ध)

सौ. हेमलता सुधाकर जोशी

विद्याधर हर्डीकर यांना पण वृद्धेश्वर मंदिरात अतिशय सुंदर अनुभव आला. तो अनुभव त्यांनी 'प्रचीती' या पुस्तकात लिहिला आहे. ते १९८३ मध्ये सुटीत कोल्हापूरला आले असताना त्यांचे सद्‌गुरू प. पू. श्री. गुरुनाथ वि. मुंगळे यांना भेटले होते. त्या वेळी त्यांनी हर्डीकरांना सांगितले की, "तुला श्वास ऐकू येईल!" हर्डीकर जहाजावर परत गेले. ध्यान करीत असताना श्वास ऐकण्याचा वेध घेत असत, पण अनुभव येत नसे. १९०४ च्या जून महिन्यात त्यांना सद्‌गुरूंनी सांगितले, "तू एकदा वृद्धेश्वरला जाऊन ये. प्रत्यक्ष भगवान शंकरच तेथे आहेत. अतिशय जागृत स्थान आहे!"

वृद्धेश्वरबद्दल हर्डीकरांना काहीच माहिती नव्हती. तिथे ते पोहोचले. एका तरुण पुजाऱ्याकडून "देवांची पंगत, सोन्याचा डोंगर, डोंगरावरील नाथांची धुनी, डोंगरावरील सर्प इत्यादी माहिती ऐकली. संध्याकाळी तिन्हीसांजेच्या सुमारास भगवान शंकरांच्या भग्न झाल्याप्रमाणे दिसणाऱ्या पिंडीसमोर जवळच जाऊन बसले. नित्यवाचन, पोथी वाचली आणि नंतर ध्यानाला तिथेच बसले. यानंतरचा अनुभव त्यांच्याच शब्दांत वाचणे महत्त्वाचे ठरते.

"मंदिराच्या गाभाऱ्यात मी एकटाच होतो. बाकी कोणी भक्त त्या दिवशी नव्हते. आवारात पूर्ण शांतता होती. हळूहळू काळोख होऊ लागला. त्या परिसरात मी एकटाच होतो! ध्यान सुरू झाल्यावर पुजाऱ्याच्या पावलांचा आवाज ऐकू आला. त्याने शंकराचा जयजयकार केला. घंटा वाजवली, आरती म्हटली. नंतर मला वाटले की तो परत गेला. माझे डोळे बंद होते.

त्यानंतर थोड्या वेळात जोराने श्वास घेतल्याचा व थोडा सावकाश सोडल्यासारखा मोठा आवाज मला अगदी जवळून ऐकू येऊ लागला. मला प्राणायाम वगैरे शब्द फक्त ऐकूनच माहीत होते. मला वाटले की, तो तरुण पुजारी माझ्या जवळच बसला असावा व प्राणायाम करीत असावा. तो आवाज चालूच होता. माझा ठरवलेला जप झाल्यावर मी डोळे उघडले. मी त्या गाभाऱ्यात संपूर्णपणे एकटाच होतो! पुजारी वगैरे कोणीही जवळपासही नव्हते. आणि त्या खोलवर श्वासाचा आवाज (Deep breathing) माझ्यासमोर दोन फुटांवर असलेल्या पिंडीतूनच येत होता...!

गाभाऱ्यातील संपूर्ण वातावरण पूर्णपणे भारलेले होते. माझे शरीरही भारलेले होते. श्वास तर जोरात चालू होता. मोठ्याने ऐकू येत होता. 'शंकर भगवान वृद्धेश्वरला प्रत्यक्ष आहेत' असे माझ्या गुरूंनी सांगितले होते. त्याचाच अनुभव त्या क्षणी मला येत होता. त्या वेळी एखादा मोठा सर्प दिसला असता तरी मी पळून गेलो नसतो. वृद्धेश्वरच्या गाभाऱ्याची मला भीती वाटली नाही. श्वास तर जोरात चालू होता. ऐकू येत होता!

थोड्या वेळाने मी स्वत:ला सावरले. बुद्धिनिष्ठतेने सावकाश गाभाऱ्याचे बारकाईने निरीक्षण करू लागलो. आवाज कोठून येत आहे, वाऱ्याचा तर आवाज नाही ना याचा वेध घेऊ लागलो. आणि मला स्पष्ट जाणवले की, त्या भग्न खडकातून म्हणजे पिंडीतूनच तो आवाज येत आहे. मी जरी फक्त दोन फूट दूर बसलो होतो, तरी पिंडीला हात लावण्याचे धाडस मला झाले नाही. आपण कोणत्या जगात आहोत, हे काय चालले आहे असाच भाव माझ्या मनात होता.

बराच वेळ तो आवाज चालू होता. माझे पाय दुखायला लागले होते. पण त्या वातावरणात पाय बदलण्याचे धाडस झाले नाही. मी परत डोळे मिटून जप केला. पण आवाज थांबण्याची लक्षणे दिसेनात. मग मात्र मी गुरूंची आणि श्री शंकरांची प्रार्थना केली की, "आता पुरे!" अशी प्रार्थना मनात वारंवार केल्यावर हळूहळू तो आवाज मंद होत गेला आणि लुप्त झाला! कापूर लावून आरती म्हटली. गाभाऱ्यातून बाहेर पडल्यावर मला वाटले की माझे आयुष्यच बदलले आहे...!!"

'साद देती हिमशिखरे' डटोवर्डस द सिल्व्हर क्रेस्ट ऑफ द हिमालयाज. या कै. जी. के. प्रधान यांनी अध्यात्मासारख्या तत्त्वजड विषयावर अत्यंत सुबोध आणि हृदयंगम भाषेत लिहिलेल्या पुस्तकामध्ये 'वृद्धेश्वर'चे अतिशय सुंदर वर्णन केलेले आहे. कै. प्रधानांसारख्या आंग्लविद्याविभूषित अद्ययावत इंग्रजी पोशाखात वावरणाऱ्या पदवीधराची आणि शंकर महाराजांची भेट झाल्यानंतर प्रधानांच्या जीवनाचे जे आध्यात्मिक परिवर्तन झाले ते अतिशय विलक्षण स्वरूपाचे होते. "आधी मनुष्यजन्म दुर्मिळ. त्यातून साधनामार्गाकडे ओढ उत्पन्न होणे त्याहीपेक्षा दुर्मिळ! पण त्याच्याही पुढे असे म्हणावेसे वाटते की, साधकाचे बोट धरून त्याला ईश्वरदर्शन घडवून आणणारे श्री. शंकर महाराजांसारखे सद्‌गुरू अधिकच दुर्मिळ!" महाराज खुशीत येऊन एकदा प्रधानांना म्हणाले, "बाळा, तू वाटेल ते माग. सत्ता, संपत्ती, दौलत काय म्हणशील ते!" प्रधान म्हणाले, "पहा बरं, मागितल्यावर म्हणाल, यापेक्षा वेगळे काही माग!" महाराज म्हणाले, "मी देईन म्हटले ना! मग वाटेल ते माग!" प्रधान म्हणाले, "मला ज्ञान द्या!" महाराज एकदम ओरडले, "बेटा, तू तर माझ्या लंगोटीलाच हात घातलास की रे! हरकत नाही. तथास्तु!" कै. बाबा प्रधान नाथपंथीय होते.

या पुस्तकातील गुरुदेव म्हणजे, साक्षात श्री शंकर महाराज! आपल्या शिष्याला वृद्धेश्वराला नेण्यासाठी त्यांनी माधवच्या आई-वडिलांकडे परवानगी मागितली. माधवच्या आईने त्यांच्या हेतूबद्दल आणि वृद्धेश्वराच्या महत्त्वाबद्दल प्रश्न केल्यावर महाराज म्हणाले, "आमचे हेतू नैसर्गिक असतात. आजपर्यंत अनेक 'मुक्त' पुरुष वृद्धेश्वराच्या परिसरात राहिलेले आहेत. वावरलेले आहेत. त्या सत्संगतीचा परिणाम म्हणून की काय तेथील वातावरणात अशी जादू आहे की जिच्यामुळे मनुष्याला तेथे स्वैर, मनमोकळे विचार सुचतात. विचार करण्याची शक्ती संग्रहित करता येते. तेथे शिवमंदिर आहे, गिरी-कुहरात जेथे शेकडो वर्षांपूर्वी पर्वतराशी होत्या. तेथील नैसर्गिक सौंदर्य तर अवर्णनीय, मनोहारी नि

चेतोहारी आहे. जनतासंपर्कापासून खूप खूप दूर अति आत जंगलात ते ठिकाण असल्याने तेथे गेल्यावर नीरव शांतता अनुभवायास मिळते. जेव्हा जेव्हा मी या भागात येतो ना, तेव्हा जवळजवळ न चुकता वृद्धेश्वरला जातोच!''

त्यांच्याबरोबर जाताना माधवला वातावरणातील बदल जाणवला. भोवतालच्या सृष्टीतील फल-पुष्प-वनस्पतींचा एक मंद सुगंध वातावरणात दरवळत होता. कानावर एक मंद-मधुर संगीत पडत होते. वृद्धेश्वर जवळ येत होते. त्या नीरव शांततेतून तो आवाज कुठल्या दिशेने येत आहे याचा मी कानोसा घेत होतो. गुरूदेव सस्मितपणे म्हणाले, ''आपण आता वृद्धेश्वराच्या परिसरात आलो आहोत. गेले शतकभर अत्यंत पवित्र व तेजपुंज असा या स्थानाचा महिमा कायम आहे!'' गुरुदेवांनी त्याला त्या डोंगरातील महत्त्वाची ठिकाणे दाखवली. डोंगराच्या माथ्यावरील नाथपंथांचे मूळ पुरुष मच्छिंद्रनाथांची समाधी दाखवली. समाधीपाशी नतमस्तक होताच त्यांच्या डोळ्यांतून अश्रू वाहू लागले. मलाही हेलावल्यासारखे वाटले!

देवळाच्या आवारात जेवण झाल्यावर ते बसले. पौर्णिमेच्या चंद्रप्रकाशात, स्वच्छ आकाशाच्या पार्श्वभूमीवर शंकर महाराजांनी देवळाची ऐतिहासिक माहिती व नाथपंथाबद्दलची माहिती प्रधानांना तेथे सांगितली!

या वृद्धेश्वराच्या परिसरात मच्छिंद्रनाथांचे महत्त्व शिवाइतकेच अत्यंत महत्त्वाचे आहे. त्यांच्या जन्मरहस्यापेक्षाही आत्मसाक्षात्कार झालेले सिद्ध पुरुष, सत्पुरुष म्हणून त्यांचे महत्त्व माहीत असणे जरुरीचे आहे. योगविद्या तिच्या सर्व अंगोपांगासह आत्मसात करण्यासाठी त्यांनी वर्षानुवर्षे घोर तपाचरण, साधना केली होती. या सर्व सिद्धी प्राप्त झाल्यानंतरही ते निरहंकारी आणि संन्यस्त वृत्तीचे होते. त्यांच्या तेजस्वी संन्यस्त जीवनाकडे व परमोच्च साधनसिद्धीकडे आकर्षित होऊन अनेक लोक त्यांचे शिष्य झाले. यांना 'नाथपंथीय' म्हणतात. या पंथाच्या मूळ शिकवणीचे सूत्र म्हणजे, ''मन व बुद्धी यांची मुक्तता, अनासक्त जीवन! शरीराबद्दल आसक्ती नाही. भूतकाळाशी संपर्क नाही! ही मंडळी चालू क्षणच वर्तमानकाळ फक्त ओळखून वागतात. 'भीती' हा शब्द यांच्या कोशात नाही. 'अनिर्बंध विचार, अव्यभिचारी निरीक्षण, मुक्त मन आणि बुद्धी ही या पंथाची मुख्य बीरूदे!'' त्यांचे शिष्य गोरक्षनाथ यांनाही आत्मसाक्षात्कार झाला! हे सर्व शिष्य कडक ब्रह्मचाऱ्याचे जीवन पत्करतात. त्यांचे वास्तव्य, त्यांचा संचार मोठमोठ्या नद्या जिथे वाहतात, घनदाट सृष्टिसौंदर्य, एकांतात, गिरिकंदरात असते. बाह्य जगाचा संपर्क नसणारे वातावरण साधनेला अत्यंत उपयुक्त असते.

मच्छिंद्रनाथांनी या जागी यज्ञ आरंभिला! देव, राजेरजवाडे, यक्ष-किन्नरांना आमंत्रित केले. असा अभूतपूर्व मेळावा कधीही झाला नव्हता. महादेव शिवप्रभूंना यज्ञसमारंभाचे अध्यक्षपद दिले होते. आज देवळात जिथे शिवमूर्ती, शिवलिंग दिसते, तिथे प्रत्यक्ष शिवप्रभू अध्यक्ष म्हणून अधिष्ठित होते. देवळाची स्थापना यानंतर अनेक वर्षांनी झाली असेल. पण मूळ बैठक हीच! वृद्धेश्वर म्हणजे शिव. या यज्ञाचा अग्नी मच्छिंद्रनाथांनी प्रज्वलित केला. तो अजूनही तसाच प्रज्वलित ठेवला जातो!

''नाथपरंपरेतील शिष्यपरंपरेने या परिसरातील हे दैवी आणि पवित्र वातावरण, त्याचे माहात्म्य आज इतक्या पिढ्या झाल्या तरी जसेच्या तसे जपले आहे. आज प्रत्यक्ष या घडीलाही या स्थानमाहात्म्याचे वैशिष्ट्य आणि खरेपण देखील कोणीही स्वत: अनुभवू शकतो. अर्थात त्याने खुले मन व बुद्धी ठेवून समजावून घेतले पाहिजे की, ''विचार कसा करावा, चिंतन व मनन कसे करावे, तरच हे शक्य आहे!''

खुद्द शंकर महाराजांच्या मुखातून हे वर्णन ऐकण्याचे भाग्य कै. प्रधानांना याच वृद्धेश्वर मंदिराच्या परिसरात लाभले. याखेरीज 'कान देऊन ऐकणे, पाहणे, निरीक्षण करणे' याचे शास्त्रशुद्ध स्पष्टीकरण दिले. निस्तब्ध मन होण्यासाठी शारीरिक, मानसिक आणि आत्मिक सामंजस्याच्या जरुरीचे महत्त्व सांगितले. असे वातावरण स्वत:भोवती निर्माण करण्यासाठी योगसाधना, समाधी, ध्यानधारणा, भक्ती यांचेही महत्त्व विशद केले!

अशा तऱ्हेने सर्व दृष्टीने पुनित झालेल्या या सुंदर आणि प्राचीन स्थानाला भेट देऊन भगवान शंकरांची आराधना करून प्रत्येक साधकाने, आध्यात्मिक ज्ञानाची उपासना करणाऱ्या उपासकांनी आपली आत्मोन्नती करून घ्यावी असे मनोमन वाटते. या स्थानाला भेट दिल्यानंतर आपल्या चित्तवृत्ती तर प्रसन्न होतीलच, पण जीवनातील अनेक खाचखळगे, संकटे यांना निर्भयपणाने सामोरे जाऊन आपली ईश्वरनिष्ठा अधिकच बळकट करण्याचा विश्वास निर्माण होईल यात वादच नाही. शंकराचार्यांच्या ''आत्मषट्कम' स्तोत्रातील वर्णनाप्रमाणे आत्मा हा सर्व विश्वाचे अधिष्ठान असून अत्यंत शुद्ध व सच्चिदानंदस्वरूप आहे. तो शिव म्हणजे सुखस्वरूप, मंगलमय आणि आनंदमय आहे. त्यालाच ब्रह्म म्हणतात आणि तेच मी आहे. दुसरा कोणी नाही, असा दृढनिश्चय, अनुभूती साधकाला प्राप्त होईल. अशा अभूतपूर्व निर्वाणाचा पूर्ण शांतीचा अनुभव घेताना त्याची वृत्ती मी 'शिव' आहे अशी बनेल...!!

***मनोबुद्ध्यहंकार चित्तानि नाहं***
***न च श्रोत्रजिव्हे न च प्राण नेत्रे ।***
***न च व्योमभूमिर्न तेजो न वायुः***
***चिदानंदरूपः शिवोऽहं शिवोऽहम् ।।***

**संदर्भ :**


१) ज्ञानेश्वरी - ६ वा अध्याय.
२) 'सिद्धयोगी' डॉ. नागेश धनेश्वर
३) साद देती हिमशिखरे - डॉ. जोशी


✧✧✧